|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## मानवविज्ञान विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

जा.क्र.क.ब.चौ.उमवि/7-इ/कला/3700/2025 दि.04/11/2025

प्रति,
मा.प्राचार्य/प्राचार्या,
कबचौउमविशी संलग्नित सर्व कला महाविद्यालये.

**विषय** :- अध्यादेश 67 नुसार बी.ए. या वर्गाच्या परीक्षेकरीता अतिरीक्त संधीबाबत...

**संदर्भ** :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र.54/2025, दि. २८/०८/२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपण आपल्या महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांचे माहे हिवाळी- 2025 मध्ये होणाऱ्या बी.ए. या वर्गाच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी अतिरिक्त संधी मिळणेसाठी विंनती अर्ज सादर केलेले आहेत.

त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीत (A) मध्ये नमुद केलेल्या विद्यार्थ्यांना अध्यादेश 67 मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी माहे हिवाळी- 2025 मध्ये होणाऱ्या परीक्षेसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्याना संधी अमान्य केलेली आहे. त्यांची नावे तक्ता (B) मध्ये नमुद केलेले आहेत. सदर बाब संधी प्राप्त विद्यार्थ्यांच्या निदर्शनास त्वरीत आणून देवून, त्यांचे परीक्षा अर्ज नियमीत परीक्षा शुल्क + अतिरिक्त परीक्षा शुल्क एक व दोन विषयांसाठी रु. 1300/- व दोन पेक्षा जास्त विषयांसाठी प्रती विषय रु. 650/- याप्रमाणे परीक्षा शुल्क स्विकारुन महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयात दि.**05/11/2025** **व** विद्यापीठ कार्यालयात दि. **06/11/2025** पर्यंत जमा करावेत. सदर परीक्षा अर्जासोबत त्या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गाच्या आज तागायत मिळालेल्या गुणपत्रकांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहेत. दि. **06/11/2025** नंतरचे प्राप्त होणारे संधीचे परीक्षा अर्ज कोणत्याही परीस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच जुन्या अभ्यासक्रमाच्या सर्व संधी संपलेल्या असल्याकारणाने सदर अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा नवीन अभ्यासक्रमानुसार समकक्ष विषयांची परीक्षा देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक व क्रमप्राप्त आहे**. तसेच, सदर विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी परीक्षा देणे करीता अतिरिक्त संधी मान्य केलेली आहे, त्या विषयाचा समकक्ष विषय हिवाळी- 2025 च्या परीक्षेतील वेळापत्रकात नमुद असणे आवश्यक आहे. सदर बाबींची विद्यार्थ्यांने व महाविद्यालयाने आपल्या स्तरावर खात्री करुनच संधीचे परीक्षा अर्ज भरावेत व दि. **06/11/2025** पावेतो विद्यापीठास सादर करावेत ही नम्र विनंती.

**सोबत**:- संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांचे A परिशिष्ठ व अमान्य केलेल्या विद्यार्थ्यांचे B परिशिष्ठ.

**List of Students Permitted/Not permitted as per 0.67 to appear for B.A. University Examination scheduled Winter -2025**

**For Examination Winter -2025 (List III)**

| (A) | संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांचे परिशिष्ठ | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Name of the Student** | **College Code** | **No.of Fail Sub.** | **Remarks** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Sonawane Raju Prakash | 110050 | 02 | Permitted |
| 2 | Tadavi Asif Shaukat | 150026 | 05 | Permitted |

कृपया वरील प्रमाणे हिवाळी 2025 मध्ये होणा-या बी.ए.वर्गाच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी परिशिष्ट (A) मध्ये नमूद केलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून संधीचे परीक्षा अर्ज विहीत तारखेच्या आत विद्यापीठात जमा करावेत ही विनंती.

आपला विश्वासू,

Sd/-
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
क.ब.चौ. उ.म.वि. जळगांव